सुधाकर परुळेकर, पुणे.

**❑ सर्कसची पार्श्वभूमी असलेले चित्रपट कोणते?**

— चंद्रलेखा, द ग्रेटेस्ट शो ऑफ इंडिया, सर्कस गर्ल, सर्कस की सुंदरी, सर्कस किंग, सर्कसवाले, मेरा नाम जोकर, अंजाने में, हाथी मेरे साथी आदी.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

**❑ उधार का सिंदूर, बंधे हाथ, जीवनज्योती, पापी हे चित्रपट केव्हा पडद्यावर आले? कलाकार कोण?**

— उधार का सिंदूर १९७६ला पडद्यावर आला होता. आशा पारेख, जितेंद्र, रिना रॉय, ओम शिवपुरी, असरानी, धीरजकुमार, प्रेमा नारायण, ऊर्मिला भट्ट, सत्येन कप्पू, मनमोहन कृष्ण, मंजू बन्सल, पेंटल, धुमाळ, जयश्री टी., रीटा भादुरी, कमल कपूर या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. बंधे हाथ १९७३ला पडद्यावर आला होता. प्रमुख कलाकार अमिताभ बच्चन, मुमताज, रणजीत, ओ. पी. रल्हन, जागीरदार, अजीत, कुमुद छुगानी, अंजना, सरदार अख्तर, मदन पुरी, असित सेन. जीवनज्योती या नावाचे चार चित्रपट आतापर्यंत पडद्यावर आले आहेत. १९३७ला पहिला जीवनज्योती पडद्यावर आला होता. प्रमुख कलाकार शकुंतलाबाई, आर. एल. मोंगे, ऊर्मिला, गुलाम कादीर, गोवर्धन, सुनलीनी देवी, १९४९ला दुसरा जीवनज्योती पडद्यावर आला होता. प्रमुख कलाकार रत्नमाला, जवाहर, विक्रम कपूर, तारा निर्मलकुमार, बेबी प्रधान, शांती मधोक, १९५३साली तिसरा जीवनज्योती पडद्यावर आला होता. कलाकार शम्मी कपूर, चांद उस्मानी, शशिकला, दुलारी, अमीरबानू, नझीर हुसेन, एस. बॅनर्जी, मोनी भट्टाचार्य, १९७३ला चौथा जीवनज्योती पडद्यावर आला होता. कलाकार विजय अरोरा, बिंदिया गोस्वामी, ए. के. हंगल, ओम शिवपुरी, सत्येन कप्पू, राकेश पांडे. पापी नावाचे तीन चित्रपट आले आहेत. १९४३ला पहिला पापी कलाकार माधुरी, सलमा, सतीश, मजनू, रामलाल, सतीश बात्रा, जहूर शहा. १९५३ला दुसरा पापी आला होता. कलाकार राज कपूर, नरगीस, दुलारी, पी. कैलाश, रमेश ठाकुर, अमरनाथ, महेंद्र. १९७७ला तिसरा पापी आला होता. कलाकार सुनील दत्त, संजीवकुमार, झीनत अमन, सरदार अख्तर, रीना रॉय, प्रेम चोप्रा, पद्मा खन्ना, मदनपुरी, दुर्गा खोटे, इफ्तीकार, जगदीश राज.

सौ. सुधा अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

**❑ 'धुंद मधुमती रात रे नाच रे' हे गाणे कोणत्या चित्रपटातील? गायिका-संगीतकार व अभिनेत्री कोण?**

— चित्रपट किचक वध, गायिका लता मंगेशकर, संगीत मा. कृष्णराव, अभिनेत्री सुमती गुप्ते.

भावना आर. सूर्यवंशी, बडोदा.

**❑ व्ही. शांताराम यांच्या भूलमधील दीवाण शरार यांनी आणखी कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका रंगवली?**

— भूलमध्ये दीवाण शरार नव्हे तर उमेश शर्मा नायक होता. त्याने अपना देश, भूल, संदेश यामारख्या काही चित्रपटात नायकाच्या भूमिका केल्या. नंतर तो मद्रासला जाऊन लेखक बनला. तेथे तामिळीतील हिंदीत डब होणाऱ्या चित्रपटाचे संवाद तामिळीतून हिंदीत अनुवाद करण्याचे काम तो करीत होता. बॉम्बेचे संवाद त्यानेच अनुवादित केले होते.

दत्तात्रय महादे कोळी, नवघर-कोळीवाडा.

**❑ मराठीत सर्वात अधिक गाजलेला चित्रपट कोणता?**

— उत्पन्नाच्या दृष्टीने माहेरची साडी आणि लाँग रनच्या दृष्टीने सांगत्ये ऐका. माहेरची साडीचा धंदा दहा कोटीच्या घरात होता. इतका धंदा आजवर एकाही मराठी चित्रपटाला मिळालेला नाही. सांगत्ये ऐका पुण्याच्या विजयानंदमध्ये सलग १३१ आठवडे चालला होता. इतका लाँग रन त्यानंतर कोणत्याही मराठी चित्रपटाला मिळालेला नाही.

मेघा मारुती कोळी, नवघर-कोळीवाडा.

**❑ अमिताभचे दोन अक्षरी चित्रपट कोणते?**

— मिली, शोले, डॉन, शान, शक्ती, कुली, मर्द, हम.

---

दिपाली आर. सूर्यवंशी, बडोदा, गुजरात.

**❑ शाहू मोडक यांनी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?**

— शामसुंदर, आवारा, शहजादा, सेवामदन, नंद के लाल, होनहार, आदमी, अपना पराया, बुलबुले पंजाब, भरत मिलाप, लढाई के बाद, उत्तरा-अभिमन्यू, सीधा रास्ता, मंदीर, वीर घटत्कोच, भगवान श्रीकृष्ण, श्रीरामावतार, मेरा लडका, जय महाकाली, श्रीकृष्ण-सत्यभामा, मायाबाजार, भीष्म प्रतिज्ञा, भक्त पुराण, द्रौपदी वस्त्रहरण, अमर कीर्तन, चक्रधारी, शिवभक्त, द्वारकाधीश, सूदर्शनचक्र, भक्त ध्रुव, लक्ष्मी पूजा, बालयोगी, मोहिनी, नागलोक, नरसी भगत, राजा विक्रम, रामलक्ष्मण, श्याम की जोगन, गोपीचंद, गजगौरी, हरिश्चंद्र, रामभक्त बिभीषण, वसंतसेना, भक्तराज, रामलीला, महारथी कर्ण, संत ज्ञानेश्वर (१९४०), संत ज्ञानेश्वर (१९६४), सुभद्राहरण, तेरे द्वार खडा भगवान, वीर भीमसेन, महासती अनुसूया, संत तुकाराम, शंकर सीता अनसूया, बलराम श्रीकृष्ण, श्रीकृष्णार्जुन युद्ध, शोभा, माता महाकाली, साधू और शैतान, तलाश हे शाहू मोडकनी भूमिका केलेले हिंदी चित्रपट. यापैकी शामसुंदर हिंदीबरोबर मराठीत होता. आवारा शहजादा, औट घटकेचा राजा या नावाने, तर आदमी माणूस या नावाने, भरत मिलाप भरत भेट या नावाने, मेरा लडका माझा मुलगा या नावाने मराठीत निर्माण झाला होता. श्रीकृष्ण सत्यभामा पारिजातक या नावाने मराठीत निर्माण झाला होता. १९४०चा संत ज्ञानेश्वर हिंदी-मराठीत होता आणि वसंतसेना हिंदी-मराठीत होता. पहिली मंगळागौर, ही माझी लक्ष्मी, विठ्ठल रखुमाई, ही तुळस तुझ्या अंगणी, सुदाम्याचे पोहे रंगल्या रात्री अशा, विठू माझा लेकुरवाळा, उतावळा नारद, सुभद्राहरण, सूनबाई, झाला महार पंढरीनाथ हे त्यांचे मराठी चित्रपट.



बालयोगीमध्ये शाहू मोडक व सुलोचना